सावित्री आणि सत्यवान
मार्कंडेय आणि यम

अक्षय कथा

Rao
1585

लेखिका : शांता रामेश्वर राव
स्वैर रुपांतर : दुर्गा भागवत

Rao
1585
10.8.15

अक्षय कथा

सत्यवान आणि सावित्री/ यम आणि मार्कंडेय

लेखिका शांता रामेश्वर राव
स्वैर रूपांतर दुर्गा भागवत

APSS LIBRARY
1585

ओरिएंट लाँगमन

ओरिएंट लाँगमन लिमिटेड
रजिस्टर्ड कार्यालय
५-९-४१/१ बशीरबाग, हैद्राबाद ५०० ०२९
इतर कार्यालये
कामाणी मार्ग, बॅलॉर्ड इस्टेट, मुंबई ४०० ०३८
१७ चित्तरंजन ॲव्हन्यू, कलकत्ता ७०० ०७२
१६० अण्णा सलाई, मद्रास ६०० ००२
१/२४ असफअली मार्ग, नवी दिल्ली ११० ००२
८०/१ महात्मा गांधी मार्ग, बंगळूर ५६० ००१
५-९-४१/१ बशीरबाग, हैद्राबाद ५०० ०२९
जमाल रोड, पाटणा ८०० ००१

© ओरिएंट लाँगमन लिमिटेड, १९८७

Rao
1585
10.8.15

ISBN 0 86131 784 X

मूळ पुस्तक इन वरशिप ऑफ शिव लेखिका शांता रामेश्वर राव
इंग्रजी © ओरिएंट लाँगमन लिमिटेड १९८६
या पुस्तकातील मजकूर ओरिएंट लाँगमनतर्फे १९७४, १९७६,
१९७७, १९८१ आणि १९८२ या साली प्रसिद्ध झालेल्या
पुस्तकातील मजकूरावर आधारीत आहे.
फोटो टाईप सेटिंग : शार्फोटाईप, मॉडर्न हाऊस,
१५ डॉ. वी. बी. गांधी मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ०२३
मुद्रक : बिंदू आर्ट, ३१४ तोडी इंडस्ट्रीयल इस्टेट, ना. म. जोशी
मार्ग, लोअर परळ, मुंबई ४०० ०१३
प्रकाशक : ओरिएंट लाँगमन लि., कामाणी मार्ग, बॅलॉर्ड इस्टेट,
मुंबई ४०० ०३८

सत्यवान आणि सावित्री

महाभारतातली गोष्ट आहे. पांडव वनवासात होते तेव्हा मार्कंडेय मुनी त्यांना भेटायला आले. युधिष्ठिराने त्यांना विचारलं, "मुनिवर्या मार्कंडेया! आमची पत्नी द्रौपदी हिच्यासारखी सुशील, गुणी स्त्री आपल्याला आणखी कुठे भेटली का?"

"होय राजा, मला ती भेटली होती. सावित्री हे तिचं नाव. अति पुण्यवान " मार्कंडेय ऋषि उत्तरले.

मार्कंडेय ऋषि पुढे म्हणाले, "भद्र देशाचा अश्वपती नावाचा थोर राजा होता. त्याला सारं सुख होतं पण मूल नव्हतं. तेव्हा राजाने सूर्यपत्नी सावित्री हिची उपासना केली. ती फळाला आली आणि सूर्यासारखी तेजस्वी अशी मुलगी राणीला झाली. ती मुलगी जणू दुसरी सूर्यपत्नी सावित्रीच होती. म्हणून तिचं नाव आईवडिलांनी सावित्री असं ठेवलं."

सावित्री सुंदर होती, गुणी होती, एवढंच नव्हे तर ती फार बुद्धिमान होती. आपली लाडकी लेक कशातही उणी राहू नये म्हणून आईवडिलांनी तिला जे जे शिकवता येईल ते ते शिकवायचा निश्चय केला. तिला विद्वान

गुरु विद्या शिकवायला ठेवले. त्यांना सावित्री नाना तऱ्हेचे प्रश्न विचारायची. झाड कसं उगवतं, सूर्य पूर्वेलाच का उगवतो इथपासून तर देव कसा आहे, कुठे आहे, माणूस किती जगतो, कसा मरतो इथपर्यंत सारे प्रश्न तिच्या मनात घोळत. त्या साऱ्या प्रश्नाची उत्तरं तिचे गुरु तिला समजावून सांगत. सावित्रीच्या चलाख बुद्धीबद्दल ते तिचे कौतुक करीत.

सावित्री मोठी होत चालली. विद्येत तिची प्रगती होती तशीच ती कला-कुसरीत देखील होत होती. आईकडून ती सूत काढायला, कापड विणायला नि कपडे शिवायला शिकली. त्याशिवाय स्वयंपाक करण्यात देखील ती तरबेज झाली.

आता तिचं लग्नाचं वय झालं. आईबापाना आता आपली लेक आपल्याला सोडून नवऱ्याच्या घरी जाणार म्हणून दुःख तर वाटतच होतं. पण त्याचबरोबर त्यांना चिंताही जाळीत होती. सावित्रीसारख्या हुशार, विद्यावंत मुलीला साजेसा वर काही त्यांना कोणत्याही राजघराण्यात दिसेना. त्याशिवाय वाटेल त्याच्याशी लग्न करायला सावित्री देखील तयार नव्हती. तिला संपत्ती, ऐश्वर्य यांचा मोह नव्हता तर तिला अनुरूप गुणी पती हवा होता.

एक दिवस नारद मुनी अश्वपतीकडे आले. नारदमुनी कमालीचे कळलावे. सावित्रीचं लग्न अजून होत नाही

असं कळल्यावर ते म्हणाले "अश्वपती, सावित्रीला स्वतःच नवरा पसंत करायला बाहेर धाड. लोक कसे रहातात, वागतात, कुठे काय आहे याचे अनायासे तिला ज्ञान होईल नि तिच्या नजरेस तिच्या आवडीचा एखादा तरुणसुद्धा पडेल. बघ बाबा!"

नारदमुनींचा उपाय अश्वपतीला आवडला. सावित्रीलाही तो पसंत पडला. अश्वपतीनं तिच्या प्रवासाची तयारी केली. तिच्याबरोबर काही विश्वासू लायक सेवक दिले आणि आईबापांचा आशीर्वाद घेऊन सावित्री पती शोधायला पालखीत बसून घराबाहेर पडली.

गावोगावी रानावनातून ती हिंडली. स्वतःचा नवरा शोधायला निघालेल्या या राजकन्येला पहायला दूरदूरचे लोकदेखील गोळा व्हायचे. कधी सावित्री त्यांच्याशी बोलायला थांबायची. त्यांची चौकशी करायची. त्यांचं क्षेमकुशल पुसायची. एवढंच नाहीतर ती त्यांना त्यांच्या कामात मदतसुद्धा करायची. मुलांशी खेळायची. कधी खेड्यातल्या कोल्हाट्यांचे नि बाहुल्या नाचवणारांचे खेळ ती पहायची. गायकांची गाणी ऐकायची नि कथेकऱ्यांच्या गोष्टी ऐकायची.

कधी सावित्री व तिच्या बरोबरची मंडळी ऋषींच्या आश्रमांत नि यात्रेच्या ठिकाणी मुक्काम करीत. अशा ठिकाणी पुण्य-पावन ऋषी-मुनी असायचे. त्यांच्याशी

सावित्री गंभीर विषयांवर चर्चा करायची नि त्यांची प्रवचनं मन लावून ऐकायची. सावित्री आपल्या प्रवासात इतक्या तऱ्हेतऱ्हेच्या गोष्टी करू, पाहू किंवा ऐकू शकली की त्या तिला आईबापांच्या छाया छत्राखाली राहून कधीच करता आल्या नसत्या.

अशीच एकदा ती वनातून चालली असताना तिला पायवाटेनं एक तरुण जाताना दिसला. त्याचे कपडे सुती नि जाडे भरडे होते. साध्या कामकऱ्यासारखे. सावित्रीनं पालखीच्या खिडकीच्या पडद्याआडून त्याला पाहिलं मात्र आणि जणू देवानींच सांगितल्याप्रमाणे तिला तत्काळ जाणीव झाली की या तरुणाशी आपलं लग्न व्हायला हवं.

''याच्याशीच लग्न कर, याच्याशीच लग्न कर'' असं जणू देवच तिच्या कानात सांगत होते. ''इथंच मुक्काम करा '' तिने आपल्या सेवकाना आज्ञा केली. आपल्या दूतांना ती म्हणाली, ''हा तरुण कोण आहे? त्याची सारी माहिती मिळवून मला सांगा.''

त्याप्रमाणे त्या तरुणाच्या शोधार्थ ते सेवक गेले. त्यांनी त्या तरुणालाच गाठून त्याच्यासंबंधी माहिती गोळा केली. परत येऊन त्यांनी सावित्रीला माहिती पुरविली. ''राजकन्ये, पूर्वी द्युमत्सेन नावाचा राजा शाल्व नावाच्या

फार मोठ्या देशावर राज्य करीत असे. शत्रूंनी त्याचं राज्य घेतलं आणि त्याला हाकलून दिलं. तो आता या वनात आपल्या बायको आणि मुलासह रहातो. म्हातारा द्युमत्सेन पुरता आंधळा झाला आहे. तो फार दारिद्र्यांत नि हालात दिवस कंठतो आहे.''

''तो तरुण त्यांचा मुलगा, सत्यवान. तो इथंच लहानाचा मोठा झाला. इथल्या वनवासी लोकांसारखाच तो राबतो नि आईबापांची सेवा करतो. त्या अभागी आईबापांना त्याचाच काय तो आधार आहे.''

'आता पुढे जायचं कारणच नाही. आपलं काम झालं. आता परत फिरावं ' असा विचार करून तिने आपल्या सोबत आलेल्या लोकांना मुक्काम हलवण्यास सांगितले. मंडळी घरच्या रस्त्याला लागली.

घरी आल्यावर आईबापांना तिनं नमस्कार केला. सत्यवानाची हकिगत त्यांच्या कानावर घालून आपण त्याचीच आपला नवरा म्हणून निवड केली आहे असं सांगितलं.

हे ऐकून राजाराणीला वाईट वाटलं. आंधळा वृद्ध वनवासी द्युमत्सेन राजा. दारिद्र्यात खितपत पडलेला. त्याचा वनातच वाढलेला मुलगा आपल्या लाडक्या मुलीन निवडावा ही गोष्ट त्यांना आवडली नाही. सत्यवानाचं ना काही नाव होत ना त्याच्याकडे काही

संपत्ती होती. ही कसली निवड केली पोरीनं? आपण उगीच या तरुण आणि उतावळ्या पोरीला वर शोधण्यासाठी पाठवलं, असा पस्तावा त्यांना झाला.

"बाळ, तू म्हणालीस ते खरंच का?" असं शंभरदा त्यांनी सावित्रीला विचारलं तेव्हा सावित्री नम्रपणे पण निश्चयाने उत्तरली. "बाबा, मी सत्यवानालाच मनाने वरलं आहे. माझ्या मुलांचा पिता व्हायला तोच लायक आहे."

आईनं आणि बापानं तिच्याकडे पाहिलं. तिच्या शब्दात कळकळ होती. तशीच त्यात शक्ती पण होती हे त्यांनी ओळखलं. तिच्या तोंडावर निश्चयाचं तेज होतं. मोहाचं कसलंही लक्षण त्यात नव्हतं. सावित्रीनं निवड पोरकटपणे केलेली नाही हे त्यांनी जाणलं.

पण ज्योतिषांकडून अश्वपतीने सत्यवानाची पत्रिका वाचून घेतली तेव्हा ती नवराबायको चिंतेने फार व्याकुळ झाली.

"महाराज, हे लग्न न झालं तर फार बरं. मुलाला वर्षापेक्षा जास्त आयुष्य नाही" ज्योतिषीबुवानी खालच्या आवाजात इशारा दिला. ते ऐकून अश्वपतीची वाचाच बसली. सावित्री काळजीनं पांढरी पडली.

बऱ्याच वेळानं अश्वपती सावित्रीच्या तोंडाकडे न बघताच म्हणाला, "सावित्री, तू दुसरा वर शोध. हे काय

म्हणताहेत ते तू ऐकलंच आहेस."

सावित्रीचा निश्चय कायम होता. "बाबा, मी सत्यवानाशिवाय दुसऱ्या कुणाला वरणार नाही." न अडखळता किंवा न कचरता तिनं पुन्हा एकवार सांगितलं. अश्वपती समजून चुकला. या सौम्य शांत सावित्रीला आता काही सांगण्यात अर्थ नाही. तिचा निश्चय कधी ढळणार नाही. माघार आपणच घेतली पाहिजे.

त्याप्रमाणे त्यानं द्युमत्सेनाकडे लग्नाचं बोलणं करायला माणसं पाठवली. अश्वपतीसारखा ऐश्वर्यशाली राजा आपली मुलगी आनंदानं आपल्या मुलाला देतो आहे हे ऐकून द्युमत्सेनाचा आनंद गगनात मावेना. त्यानं लागलीच होकार दिला. स्वप्नातसुद्धा त्याला हे खरं वाटलं नव्हतं. सत्यवानानंही सरळ सांगून टाकलं. "मी सावित्रीला पाहिली त्या क्षणापासूनच माझं तिच्यावर प्रेम बसलंय.

मग मोठ्या थाटामाटात सावित्रीचं सत्यवानाशी लग्न लागलं. सावित्री सत्यवानाबरोबर आपल्या घरी आली. तिचं घर म्हणजे रानातली एक लहान झोपडीच होती. सावित्री घराचा उंबरठा ओलांडून आत आली नाही तोच सत्यवान तिला म्हणाला, "सावित्री, इथे दास, दासी कुणी तुझी सेवा करायला नाही. माझे आई-बाप म्हातारे

आहेत. त्यांचं सारं तुलाच पहावं लागेल. तू आजवर राजवाड्यात ज्या ऐश्वर्यात वाढलीस त्याच्यापेक्षा इथं फार वेगळ्या तऱ्हेने तुला रहावं लागेल. वनात रहाणाऱ्यांचं जीवन कठीण असत. मी घरी फार उशीरा येतो. तेव्हा तुला या दोघा म्हाताऱ्यांशिवाय कुणाची सोबत असणार नाही. माझ्या घरी तुला पुष्कळ वेळ एकटीलाच काढावा लागेल.''

सावित्रीनं नुसतं हसूनच त्याला उत्तर दिलं. ते हसणं सूर्यप्रकाशासारखं स्वच्छ होतं. त्यातच सत्यवानाला सारी उत्तरं मिळाली.

लवकरच सावित्री आपल्या संसारात रुळली. आता ती आपल्या घरात मोकळेपणाने वावरत होती. घरातलं एकेक काम ती इतक्या सफाईनं, नाजुकपणे करायची की तिचा तो सहजपणा पाहून सत्यवान आश्चर्यचकीतच झाला.

झोपडीच्या सभोवारच्या भाज्या नि वनस्पती खुडून त्या रांधून ती जो स्वयंपाक करायची त्याची चव काय विचारावी? ते अन्न पोषक नि कसं स्वादिष्ट असायचं! पदार्थाचा घमघमाट असा सुटायचा की तो इतर कुठल्याही अन्नाला कुठे यायचा नाही. तिने घासलेली भांडी नुसती लखलखत. त्या भांड्यात ती स्वच्छ गारसं पाणी भरून ठेवायची. सणासुदीच्या दिवशी तांदळाच्या

पिठात पाणी घालून ती दारात रांगोळ्या काढायची. काम करताना ती गाणं म्हणायची. त्यामुळे एकेकाळी शांत नि बाजूला पडलेलं ते घर आता आनंदाने नि उत्साहाने थरारून निघायला लागलं. म्हातारे सासू-सासरे तिला दुवा देऊ लागले. सत्यवान सुखी झाला. त्याला सावित्रीचा अभिमान वाटू लागला.

पण त्या म्हाताऱ्यांना काय किंवा सत्यवानाला काय, सावित्रीच्या मनाला जो विचार जाळत होता त्याची पुसटशीही कल्पना नव्हती. काम करताना ती सारखी देवांची स्तोत्रं का गुणगुणायची त्याचंही कारण त्याना माहीत नव्हतं. ज्योतिषांनी तिच्या नवऱ्याचं भविष्य सांगितल्यापासून अत्यंत श्रद्धाळू मनानं ती सदैव प्रार्थना का करायची तेही कुणाला माहीत नव्हतं. आपला पती आपल्याला दुरावू नये म्हणून ती सतत देवाला आळवीत असे. यामुळे तिच्या अंतःकरणात अशी काही श्रद्धा निर्माण झाली की काही झालं तरी मृत्यूवरसुद्धा आपण जय मिळवू.

सावित्रीच्या वागणुकीचं सत्यवानाला कोडं पडलं. त्या दोघा म्हाताऱ्यांना वाटे, सावित्री हे सारं करून आजारी तर पडायची नाही? तिची व्रत वैकल्यं पाहून सासू नि नवरा दोघं म्हणायची, ''सावित्री तू किती श्रमतेस शिवाय ही व्रतं? तू आजारी पडशील बरं.'' पण ती

प्रसन्नपणे गोड हसत उत्तर देई. "मी एक दोन नवस केले आहेत, ते नकोत फेडायला? एवढ्याशा करता काळजी कशाला करायची? नि हे काही फार दिवस चालायचं नाहीयं."

असे करता करता, दिवस गेले, आठवडे उलटले, महिने लोटले. वर्ष उलटायला फक्त तीन दिवस उरले होते. सावित्री आपल्या सासू-सासऱ्यांच्या पाया पडली. "आपण मला हे शेवटचं व्रत करताना आशिर्वाद द्यावा तीन दिवस नि तीन रात्री मी जागून उपोषण करणार आहे. पाणी सुद्धा पिणार नाही. हा सर्व काळ मी ध्यान लावून ईश्वराची प्रार्थना करणार आहे. त्या काळात मला कुणाशी बोलता यायचं नाही. कुणी माझ्याशी बोललं तर माझं मन चळेल नि व्रत मोडेल. या तीन रात्री क्षणभर देखील झोपून चालायचं नाही. क्षण न् क्षण मोलाचा आहे. तो वाया दवडायचा नाही."

सावित्रीचे सासू-सासरे यांना काहीच कळेना. अचंबा वाटून सासू अचंबून तिच्याकडे बघत राहिली. मग ती दोघं तिला समजावत होती. "बाळ, अजून तुझं पोरवयच आहे. तप काही लहानांनी करायचं नसतं. तू तरुण आहेस, तर तारुण्याची सारी सुखं तू उपभोगावीस. सावित्री, तारुण्याचे दिवस काही पुढे परतून येत नाहीत."

"पण मामंजी, सासूबाई, मी आनंदात आहे. खरंच

सुखात आहे. मला आशिर्वाद द्या." तिनं वाकून त्यांच्या पायावर डोकं ठेवलं. दोघांनी तिला उचलून घेऊन आपल्या पोटाशी धरलं. त्यांनी तिला आशीर्वाद दिला. "देव तुझी इच्छा पूर्ण करो."

ते तीन दिवस आणि तिन्ही रात्री सावित्रीने उग्र व्रत करण्यात घालवल्या. प्रथम तिनं नदीत थंडगार पाण्यात पहाटेच स्नान केलं. मग तिन वनात एकांतात मूकपणे प्रार्थना सुरू केली. सांगितल्याप्रमाणे तिनं अन्नाला किंवा पाण्याला स्पर्श केला नाही. ती सारखी देवाची आळवणी करीत होती. देवाशिवाय आता तिला काही दिसतच नव्हतं. देवाशी ती अगदी तद्रूप होऊन गेली. एका खडकावर ध्यान लावून ती बसून राहिली.

तिसरी रात्र उलटली. पहाट झाली. सावित्रीनं डोळे उघडले. ज्योतिषांनी सांगितलेला हाच तो काळ दिवस हे तिला आठवलं. तिचं काळीज धडधडू लागलं. ती झोपडीत गेली. सत्यवान अजून झोपलेला होता. सावित्री त्याच्याजवळ तशीच बसून राहिली. तो उठला. तिनं त्याला आंघोळीला पाणी काढून दिलं. आंघोळ आटोपल्यावर त्याला जेवायला वाढलं. सत्यवान खाऊन पिऊन रोजच्याप्रमाणे लाकडं नि फळं आणायला रानात जायला निघाला तेव्हा अचानक उभी राहून सावित्री सत्यवानाला म्हणाली, "आज तुमच्याबरोबर मला न्या."

तिचं बोलणं ऐकून सत्यवानाला नवल वाटलं. "भलतच काहीतरी. सावित्री, आपण दोघं बाहेर गेलो तर माझ्या आईबाबांना कोण पाहील? त्यांना एकटं सोडून कसं जायचं?" सत्यवानाने उत्तर दिलं.

त्या दोघांचं बोलणं त्या वृद्ध जोडप्याच्या कानी गेलं असावं. ती दोघंही एकदमच म्हणाली, "सत्यवाना, तिला बरोबर घेऊन जा. अजूनपर्यंत सावित्रीने मला काही हवं असं कधी म्हंटल नाही. आज ती तुझ्याबरोबर जायचं असं म्हणतेय. तिची इच्छा मोडू नकोस."

सत्यवान तिला न्यायला तयार झाला. ती दोघं घराबाहेर पडली नि चालू लागली. सत्यवानालाही तिला बरोबर आणलं याचा फार आनंद झाला. जिथं सावित्री तिथं आनंद असतो. तिच्यामुळे सारा मार्ग प्रकाशानं उजळून निघाला होता. नेहमीच्या वस्तू देखील सौंदर्यानं तळपत होत्या.

दाट रानात गेल्यावर एके ठिकाणी सत्यवान थांबला. कुठल्या झाडाची लाकडं तोडायची ते त्यानं ठरवलं. मग तो सावित्रीला म्हणाला, "सावित्री, तू जरा बस नि मन रमव. मी आता कामाला लागतो."

जवळच गवतावर सावित्री बसली. सारं वन कसं छान गार होतं. झाडाच्या पानातून उन्हाचे कवडसे पडले होते. त्यामुळे पानं चमकत होती. गर्द पानातून घरटी

बांधणारी पाखरं आत बाहेर उडत होती. थोड्या अंतरावर एक हरिणी आपल्या पाडसाला चाटत होती. इतक्यात ती हरणं काही कारणाने सावध झाली आणि पळाली. पळताना त्यांच्या शेपट्या हवेत तरंगल्या. एका मोरानं अंगाला झटका देऊन आपला पिसारा फुलवला. सावित्रीच्या सभोवार सर्वत्र सुंदर जग भरलेलं होतं. आणि त्याच्या त्या सौंदर्याला प्रतिसाद देताना तिचं हृदय उचंबळून आलं.

पण त्याचक्षणी एक दुःखी विचार करवती सारखं तिचं मन चिरत गेला. सत्यवानाशिवाय हे सारं व्यर्थ आहे हे तिला जाणवलं. ती निश्चल बसली. तिनं हात जोडले आणि एक करुण प्रार्थना तिच्या हृदयातून बाहेर पडली.

सत्यवान झाडावर घावामागून घाव घालीत होता. त्याच्या कुऱ्हाडीचा दणका प्रत्येक फटकाऱ्या बरोबर तिला ऐकू येत होता. प्रत्येक घाव नेटका होता. एका लयीत संथपणे, ठामपणे घाव पडत होते. पण काही वेळानं घावाच्या आवाजात बदल झाला असे तिला वाटलं. सावित्रीचा श्वास कोंडला. तिचं शरीर कापू लागलं कारण घाव आता पहिल्यासारखे सपसप पडत नव्हते. ते मंदावत चालले होते. छे! ऐकण्यात काही चूक नव्हती. घाव खरोखरच क्षीण होत होते. काहीतरी

विपरीत घडत आहे हे सावित्रीला कळून चुकलं.

इतक्यात कशाचा तरी भास होऊन ती डोळे वर करून बघू लागली. चहूकडे काळोखाचं साम्राज्य पसरल्यासारखं तिला वाटलं. तेवढ्यात त्या काळोखात तिला प्रकाशाची तिरीप दिसली. त्यातून एक आकृती बाहेर पडली आणि तिच्यासमोर उभी राहिली.

झाडावरचे घाव आता फारच अस्पष्ट झाले होते. ते चुकू लागले. नंतर तर ते एकदम बंदच झाले. सत्यवानाच्या हातातली कुऱ्हाड गळून खाली पडल्याचा आवाज आला. सत्यवान धडपडत आपल्याजवळ येताना तिनं पाहिला. अगदी क्षीण आवाजात तो बोलण्याचा प्रयत्न करत होता. "सावित्री, मला-मला-कसं तरी-कसं तरी होतंय. मला वाटतं की मी–" सत्यवान खाली पडणार तोच सावित्रीने दोन्ही हातानी त्याला सावरलं.

"थोडा विसावा घ्या. तुम्हाला बरं वाटेल" सावित्री हलकेच त्याला धीर देत होती. पण तिच्या काळजानं ठाव सोडला होता. त्याचं डोकं मांडीवर घेऊन ती बसली. त्याचा चेहरा पांढरा पडला होता. ओठ निळे झाले होते. तिनं त्याच्या कपाळावरचे केस मागे सारले. ते घामाने भिजले होते. त्याच्या चेहऱ्यावर थंडगार घामाचे थेंब जमले होते. "सत्यवान, सत्यवान" अशी

अत्यंत प्रेमळ मृदु आवाजात तिने हाक मारली आणि मग "सत्यवान, माझा पती" अशी भयाने गोठलेली किंकाळी तिच्या तोंडून बाहेर पडली. रानभर ती घुमत राहिली. पण सत्यवान निश्चेष्ट होता. त्याचा श्वास बंद झाला होता.

सावित्रीनं पाहिलं की कुणीतरी आपल्याजवळ येत आहे. आता ती आकृती त्या दोघांच्या अगदी जवळ आली. सावित्रीनं ओळखलं हा यम आहे. न्याय, सत्य नि मृत्यू यांचा देव-प्रत्यक्ष यम.

यमाची आणि सावित्रीची नजरा-नजर झाली. यमाचे डोळे खोल होते, लाल होते. पण त्यांच्यात खोलवर सूज्ञपणा व सामंजस्य भरलं होतं. त्याचे डोळे अतिशय करुण होते. त्या डोळ्यांकडे तिने निरखून पाहिलं आणि तिची भिती साफ गेली. तिला हलकं वाटू लागलं.

यमाच्या हातात एक दोरी असून तिच्या टोकाला फास होता. मर्त्यलोकातून मृतलोकात एखादा जीव नेत असताना तो फास लावून ओढला जातो हे सावित्रीला माहीत होतं.

सत्यवानाच्या गळ्याभोवती फास अडकवण्यासाठी यम जरासा लवला. त्याबरोबर त्याला अडवण्यासाठी सावित्रीने आपला हात वर केला. यमानं क्षणभर तिच्याकडे रोखून पाहिलं. तिला आपण दिसतो आहोत

अशी त्याची खात्री पटली आणि तो तिला म्हणाला, "बाळ, सारं सरलं आहे. सत्यवान मेला आहे आणि मी त्याला घेऊन जायला आलो आहे. तू पतिव्रता आहेस, चांगली आहेस, धीराची आहेस. पण आता तू त्याला माझ्या हवाली कर कारण तो माझा आहे."

"देवा, तुम्ही मला दिसलात हे केवढं आश्चर्य. तुमचा आवाज मला ऐकू येतोय हे सुद्धा नवलच आहे. हे स्वप्न तर नाही?" सावित्री उद्गारली.

"हे स्वप्न नाही. मी खराच यम आहे. सामान्य माणसांना मी दिसत नाही. स्वर्गातल्या देवांना पहायला दिव्यदृष्टी लागते. तुझ्या प्रार्थनांनी आणि दीर्घ व्रत-उपासांनी ती दृष्टी तुला प्राप्त झाली आहे म्हणूनच मी तुला दिसतो आहे."

यमानं सत्यवानाच्या गळ्यात फास घालून फासाची गाठ घट्ट आवळली. मग तो वळून चालू लागला. सत्यवानाला तो फरफटत नेत चालला होता. सावित्री उठली. यमाच्या आणि आणि आपल्या पतीच्या मागोमाग ती चालू लागली.

रानातून दक्षिणेच्या दिशेनं यम नि मागाहून सावित्री चालत होती. अखेर ते वन आणि जिवंत माणसांचं जग मागे पडलं आणि अगदी एकाकी वाटेने ते चालू लागले. तेथे पिसाट वारं वाहत होतं. अंधुक प्रकाश सर्वत्र भरला

होता. यमाचा धिप्पाड काळा रेडा एके ठिकाणी त्याच्यासाठी थांबला होता. यम पुढे गेल्यावर तोही त्याच्या मागोमाग जाऊ लागला.

ही सारी जणं आता दाटशा धुक्यातून जाऊ लागली. तशी धुक्यात हालचाल होऊन दोन अत्यंत क्रूर चेहऱ्याचे कुत्रे गुरगुरत पुढे आले. श्याम आणि शबल हे ते दोन यमाचे कुत्रे होते. साखळदंडाने बळकट बांधले असूनही त्यांची शरीरे क्रोधाने थरथरत होती. त्यांनी दात विचकले होते. त्या दोघांवर कडक शब्दात डाफरून यम आपल्या राजधानीत शिरला.

सावित्री देखील न कचरता यमाच्या मागोमाग गेली. श्याम-शबल गुरगुरतच होते. तेव्हा यमाने मागे वळून पाहिलं.

"काय तू? मुली इथं तू का आलीस? कशी आलीस?" यमाने तिच्यावर प्रश्नांची सरबत्ती केली.

"मी माझ्या पतीच्या मागून आले. जेथे ते जातील तेथे त्यांच्या मागोमाग मी गेलं पाहिजे. नाही का?" असं म्हणून तिनं यमाच्या तोंडाकडे पाहिलं नि ती जराशी हसली.

यमानं मान हलवली. त्याचे डोळे चिंताग्रस्त झाले. "नाही, बाळ तू यमपुरीत, मृतांच्या नगरीत नाही यायचंस." तो तिच्याकडे पाहून प्रेमळपणे हसला.

"मुली, कुणीही जिवंत माणूस या ठिकाणी येत नाही आणि अजून कुणी कधी आलेलं नाही."

"नसेल आलं. म्हणून काय झालं? मला माझ्या पतीबरोबर राहिलंच पाहिजे. माझी शपथ मला कशी मोडता येईल?"

"पण मुली तुझा नवरा सत्यवान मेला आहे." यमानं शांतपणे पण ठामपणे शब्द उच्चारले. यमाच्या तोंडाकडे बघत सावित्री शांतपणे उत्तरली. "पण सत्यवानाशी माझं लग्न लागलं त्यावेळी मी त्याला वचन दिलं होतं. 'तुम्ही जाल तिथे मी येईन.' देवा तुम्हाला माझी शपथ खोटी ठरावी असं वाटतं का? नाही ना?"

"पण मुली, इथं फक्त मरण आहे. मरण हे जगण्याहून वेगळं असतं. मरण म्हणजे जीवनाचा अंत. मरण ही दोन जीवांमधली भिंत आहे. मृत्यू शपथ, वचन काही जाणीत नाही. मृत्यूबरोबर माणसांचे मार्गच बदलतात." यमाने चिडून भिवया वाकड्या केल्या. "माझ्याशी असे वादंग कधी कुणी घातलं नव्हतं."

"कदाचित लोकांना तुमची भीती वाटली असेल."

"तुला नाही माझं भय वाटत?" यमानं विचारलं. त्याच्या तीव्र आवाजात आश्चर्य भरलं होतं.

सावित्री हसली. "मुळीच नाही. देवा, मी पाच पावलं तुमच्याबरोबर चालले आहे नि त्यामुळे तुम्ही माझे

मित्र झाला आहात. मी तुमच्याबरोबर प्रवासाच्या अखेरपर्यंत येईन. मी काय म्हणून तुम्हाला घाबरू?"

यमानं चमकून तिच्याकडे पाहिलं. "तू मला का भ्यावंस? अग, बलाढ्यवीरसुद्धा माझं नांव ऐकलं की भयानं कापतात. मी यम आहे. प्रत्यक्ष मृत्यू. माझं नांव लोकांच्या मनात द्वेष नि भय निर्माण करतं. मी रेड्यावर बसून येतो नि लोकांचे प्राण हरण करतो. माझ्या मागे खूप रडारड होते. दुःखाचं वैराण वाळवंट पसरतं."

यमानं निरखून सावित्रीच्या तोंडाकडे पाहिलं. त्यावर भीतीचा लवलेशही नव्हता. ती म्हणाली, "तुम्ही नुसतं नाटक करीत असाल. कदाचित तुम्ही सरळ, साध्या लोकांना उगीच घाबरवून सोडत असाल."

सावित्री हे बोलत होती तेव्हा यम आश्चर्याने आणि कुतूहलाने तिच्याकडे बघत होता. त्याला आता कळून चुकलं होतं की त्या निरागस, तरुण आणि सरळ मनाच्या पोरीने बाह्य करड्या स्वरूपा आड दडलेलं आपलं अंतर्मन चांगलं ओळखलं आहे. पण तरी आपलं कर्तव्य पार पाडणं त्याला भागच होतं. तो मनात म्हणाला, "माझ्या कर्तव्याआड मी तिला कसं येऊ द्यावं? प्रथम कर्तव्य. मग बाकीचं".

पण सावित्रीची मोहिनीच अशी होती की यमाचा सारा युक्तिवाद तिच्यापुढे निष्प्रभ ठरला. त्याची आपल्या

बाबतची सर्व समर्थने तिच्यापुढे कोसळू लागली. अगतिकपणे त्यानं तिला सांगितलं, "बाळ तू माझ्याबरोबर येऊ नकोस. तू येता कामा नयेस."

"पण मला आलंच पाहिजे. मला आता दुसरा मार्गच राहिलेला नाही," सावित्री ठासून म्हणाली. "तुम्हीच बघता ना?"

"सावित्री तुझी वेळ अजून आली नाही. परत जा." आपल्या सोशिकपणाचं आता यमालाच नवल वाटू लागलं होतं.

तेवढ्यात त्याला प्रत्येक मानवी हृदयात असलेला दुबळेपणाही आठवला. खरोखरच देवाप्रमाणे कृपावंत होऊन तो हात वर करून म्हणाला, "सावित्री मी तुझ्यावर प्रसन्न झालो आहे. माझा तुला आशिर्वाद आहे. वर माग."

तिचे डोळे चमकले. तिचं सगळं शरीर उतावीळ होऊन उठलं. तिनं बोलायला तोंड उघडलं. इतक्यात आपलं पहिलं बोट हलवीत यम घाईघाईनं बोलू लागला. "कोणताही वर माग. पण बाळ, सत्यवानाचा प्राण परत मागू नकोस. त्याचा प्राण माझा आहे. तो परत मिळायचा नाही."

सावित्रीचा चेहरा पडला. "अरेरे! हे दुर्दैव आहे. पण यमराज तुम्ही किती चांगले आहात हो." सावित्रीनं

खालच्या स्वरात यमाची स्तुती गायली.

ते बोलणे ऐकून यम सुखावला. पण लगेच त्यानं स्वतःला सावरलं. आपण काही झालं तरी वाकायचं नाही असा निश्चय करून तो म्हणाला, "वर माग, सावित्री, वर माग."

हात जोडून सावित्रीने यमाकडे वर मागितला. "देवा, माझे मामंजी आंधळे आहेत. आपल्या कृपेनं त्यांची दृष्टी परत येऊ द्या."

यमाचं हृदय दयेनं, कृपेनं ओसंडू लागलं. "आनंदाने मी तुला हा वर देतो. सावित्री, यम क्रूर दिसतो पण त्याचं हृदय मृदू आणि उदार असतं हे तुला आता कळलंच असेल. आता मुली तू घरी जा. मला आपल्या वाटेनं जाऊ दे" असे म्हणून तो तडक चालू लागला.

चालता चालता यमाने मनाशी विचार केला. "मला वाटलं होतं तसंच हे काम सोपं झालं. अगदी सोपं. वर दिला की माणसं मवाळतात. मला भिती वाटत होती की सावित्रीला परतवणं आपल्याला शक्य होणार नाही." एक निश्वास टाकून यम पुढे जाऊ लागला.

इतक्यात त्याला आपण वाहून नेत असलेलं ओझं जड झाल्यासारखं वाटू लागलं. त्या मुलीचा कोमल आवाज त्याला सारखा आठवू लागला. तिची हसरी मूर्ती त्याच्या डोळ्यांसमोर उभी राहिली. त्याला एकदम

आपण म्हातारे आहोत, एकटे आहोत, नीरस आहोत असं वाटू लागलं. आपल्या अस्तित्वामध्ये प्रचंड एकाकीपण आहे असे त्याला वाटू लागले. प्रथमच आपण सदैव एकटेच होतो हे त्याला आता जाणवलं.

सावित्री क्षणभरच त्याच्या डोळ्याला डोळा देत हसली तेव्हा त्याच्या मनातील अंतरंगातला काळोख थोडा कमी झाला होता. त्याचा एकटेपणा दूर झाला. यमाला वाटलं, आपण देव असलो तरी सावित्रीने आज आपल्याला जो आनंद दिला तसा आनंद आपण पूर्वी कधीही अनुभवला नव्हता.

जड अंतःकरणाने यम स्वतःशी बोलत होता. ''ठीक आहे. प्रत्येक गोष्टीला शेवट असतोच तसाच माझ्या या प्रसन्न भेटीचाही शेवट झाला. तो असायचाच.'' तो कष्टाने पुढची वाट चालू लागला.

इतक्यात त्याला पावलांचा आवाज ऐकू आला. तो थांबला तसा पावलांचा आवाजही बंद झाला. तो मागे वळला तर सावित्री त्याच्या पुढ्यात उभी. ''तू आता मृतांच्या जगात, यमलोकात चालते आहेस.'' यमाच्या बोलण्यात जरा रागच होता.

''होय. मी चालतेच आहे. जिथे माझा पती जाईल तेथे मला जायलाच हवं'' सावित्री उत्तरली.

यमाला काही सुचेना. कसेतरी त्यानं शब्द गोळा

केले. ''हे...... हे तर कधी कुणी ऐकलेलसुद्धा नाही. मी तुला आधीच बजावून सांगितलं ना की तुझी इथे यायची वेळ अजून आली नाही. देवानं दिलेलं आयुष्य संपायच्या आधी क्षणभर देखील कुणाला या लोकात येता येत नाही. तुला कळत नाही का की या साऱ्या गोष्टी संचिताने अगोदरच ठरलेल्या असतात ते? आणि मनुष्यमात्र दैवगतीच्या नियमानुसार चाललं नाही तर जगरहाटी कोसळेल.''

यम हे सर्व बोलला खरं पण तिच्या डोळ्यावरूनच त्याला कळलं की तिला नियम, जगरहाटी हे काहीच मान्य नव्हतं. तिला फक्त प्रेमच काय ते ज्ञात होते. यमाची आज्ञा पाळायचा तिचा इरादाच नव्हता.

हे पाहून यम मोठ्या बुचकळ्यात पडला. आता फक्त एकच उपाय होता. तिला वर देण्याची फिरून लालूच दाखवणं.

''सावित्री, पुन्हा ऐक. माझ्याकडे, सत्यवानाचा प्राण सोडून तू काहीही माग आणि तू घरी जा.''

ती विचारात पडली. जरा थांबून तिनं आपली इच्छा प्रकट केली. ''माझे सासू-सासरे दारिद्र्यात काळ कंठताहेत. देवा, माझ्या मामंजीना त्यांचं राज्य नि वैभव परत मिळू दे.''

''तथास्तु'' यम आनंदून म्हणाला. मर्त्यलोकाच्या

दिशेनं बोट दाखवत त्यानं सावित्रीला पुन्हा एक वार सांगितलं. "बाळ आता तू घरी जा. ज्या लोकातली तू आहेस त्या लोकात जा." सत्यवानाला उचलून त्यानं रेड्याच्या पाठीवर ठेवलं. रेड्याला त्याने ढकललं तसा तो रेडा आपली शिंगं उभारून चालू लागला.

ते चार पावलं चालून गेले असतील नसतील तोच यमाला सावित्री आपल्या मागोमाग अजूनही येतच आहे असं दिसलं. तो भडकला. 'ही मला जुमानत नाही. माझा शब्द मानीत नाही. एवढं तिचं अवसान म्हणजे काय?' यमाला एका क्षुद्र मुलीनं आपल्याला नमवलं याची यमाला लाज वाटली. तो रागानं दांत ओठ खाऊ लागला.

मुद्दामच दगड, काटे कुटे असलेली वाट काढून यम चालू लागला. दगडांच्या धारा लागून, काटे बोचून सावित्रीचे पाय रक्तबंबाळ झाले. सारीकडून दुर्गंधीयुक्त धूर तिला कोंडू लागला. तिचा जीव घुसमटू लागला. भयावह व भीषण आवाज तिला भेडसावत बजावू लागले.

"परत फिर. परत फिर. हे जग मेलेल्यांचं आहे. जिवंत माणसाला इथे थारा नाही."

"पण सत्यवानाला सोडून मी कशी जाऊ? जिथं तो तिथंच मी" ती आक्रोशून म्हणाली आणि यमामागून

चालतच राहिली.

अखेर थकलाभागला व शिणलेला यम एके ठिकाणी खाली बसला. मृत्युचा अधिष्ठाता, बलाढ्य यमराज थांबला. सावित्री त्याच्याजवळ येऊन उभी राहिली. ती उभी होती त्याच्या चहूबाजूला प्रकाश होता. सावित्रीला काहीच कळत नव्हतं.

प्रकाशात सावित्री उभी राहीलेली पाहून यम फार क्षुब्ध झाला. "अग मूर्खे, मी तुला आणखी एक वर देतो. सत्यवानाचा प्राण सोडून तुला मी काहीही देईन. वर माग आणि निघ कशी." यम सरळ ताठ उभा राहिला आणि त्याने आशीर्वाद देणारा हात पसरला.

"तुम्ही किती उदार आहात " सावित्री पुटपुटली. "देवा, माझ्या वडिलांना मुलगे नाहीत. दयाळू देवा, त्यांना पुत्र द्या."

यमाचं मन पाझरलं. या धैर्यवान मुलीनं आपला स्वतःचा विचार कधीच केला नव्हता. यमाला सावित्रीच्या आवाजानं व हास्यानेही मोहित केले होते. 'तिचा आवाजही किती गोड नि नम्र आहे. तिचं हसणं कसं झटकन उमटतं नि किती प्रसन्न आहे.' उत्सुकतेनं तिच्याकडे पहात यम उद्गारला, "तथास्तु. वर पुरा होईल. जा बाळ, तू घरी जा. तुला घरी खूप सुख लाभणार आहे."

सावित्री काही केल्या हटेचना. "मी सत्यवानाला सोडणार नाही" हे तिचं पालुपद सुरूच होते. यमाला हिने आपल्याला फसवलं आहे असे वाटले. तो पुटपुटला, "माझ्या मागून येणं म्हणजे काय ते दाखवतोच तुला. मघाच्यापेक्षा ते फार भयानक आहे. अजून कधी पाहिलेलं नाही ते तुला दिसेल."

मग यमान सावित्रीला उजाड वाळवंटातून, निसरड्या दलदलीतून फिरवलं. तो तिला अशा ठिकाणी घेऊन गेला की संधिवात, ज्वर, संग्रहणी नि देवी असे भयानक रोगांची बाधा झालेल्यांची भुतं तिथे रडत होती. तिथे मृत माता आपण मागे सोडून आलेल्या अपत्यांबद्दल शोक करीत होत्या. मस्तकविहीन योद्ध्यांची धडं हाडांचे सापळे झालेल्या घोड्यांवर स्वार झाली होती. पापी आत्म्यांनी केलेल्या पापांच्या क्षालनार्थ, त्यांचे रक्त काढले जात असताना ते आत्मे मोठमोठ्याने विव्हळत रडत होते. सावित्रीला तिथे भुकेले, तहानेले आत्मे दिसले. ते दुष्काळाचे, धरणीकंपाचे नि पुरांचे बळी होते. ती भुतं हात पसरून सावित्रीचं वस्त्रं ओढू लागली.

अग्निरूपी, बर्फरूपी नरकामध्ये मृतांचे आत्मे तडफडत होते. ज्यांनी आपल्या आयुष्यात दुसऱ्यांना पीडलं होतं, ते आत्मे भयंकर यमयातना भोगत होते. ज्यांचा मृत्यू खुनामुळे झाला होता असे मृतात्मे तेथील

रस्त्यांवरून सूडाच्या गर्जना करीत हिंडत होते.

"मागे फिर. मूर्ख पोरी मागे फिर" यम दरडावत होता. आता त्याचा आवाज दुरून आल्यासारखा वाटत होता. "जा मुली. आता यापुढे आणखी भयानक गोष्टी आहेत."

सावित्रीचा चेहरा फिकट पडला होता तरी डोळ्यात निश्चयाचं तेज कायम होतं. ती मागे फिरेना. यम फिरून आग्रहाने म्हणाला, "माणसांचं भविष्य त्याच्या जन्माआधीच लिहिलेलं असतं आणि जे विधिलिखित असतं ते कधी पुसलं जात नाही की बदलत नाही. दैवानं हा सत्यवान मला दिला आहे. सावित्री दैव अटळ आहे."

"पण यम देवा, मी त्याला कसं सोडू? सत्यवान माझा पती आहे. जिथं तो जाईल तिथं त्याच्या मागोमाग मी जाणारच" तोंडानं सावित्रीचा जप सुरूच होता.

आता यम त्राग्यानं, निराशेनं ओरडला. "आणखी एखादा वर मागून घे. सत्यवानाच्या प्राणाशिवाय काहीही माग. सत्यवान माझा आहे." यावेळी यम मनात हिशेब करत होता. 'लवकरच हिची शक्ती जाईल. किती झालं तरी तिचं हाडमांस हे अखेर मर्त्य प्राण्याचंच आहे.' यमाचे पाचूसारखे हिरवे, घारे डोळे तो बरोबर असलेल्या सत्यवानाच्या निळ्या चेहऱ्याकडे पाहू लागले. यमाची

लांब बोटं त्याच्या केसांतून आत बाहेर फिरू लागली. आणि त्याचा आत्मविश्वास परतून आला.

त्याला आपल्या शक्तीचा आणि आपल्या मालकी हक्काचा गर्व वाटून हसू आलं. 'ही पोर सावित्री किती बारीक नि दुबळी आहे! तिची श्रद्धा बालिश आणि कीव करण्यासारखी आहे' असा विचार त्याच्या मनात आला.

तो उघडपणे सावित्रीला म्हणाला, "सावित्री, तू शूर मुलगी आहेस. मी तुझ्यावर प्रसन्न झालो आहे. यावेळी मी स्वतःच तुला वर देणार आहे आणि तो वर केवळ तुझ्यासाठीच असेल."

हे बोलताना यमाचा उर दाटून आला होता. मनातच त्याचे विचार चालले होते. 'लोक मला कृतांत म्हणतात, कठोर शासन असणारा असे मला म्हणतात. खरं तर माझी नावं वरद-वर देणारा-आणि सुखदायक अशीच असायला हवी होती.'

यावेळी सावित्री त्याच्यासमोर हात जोडून गुडघे टेकून बसली होती.

"वर माग. मी तुला असा वर देतो की तुला या यमाची कायम आठवण राहील." छाती पुढे काढून यम बोलत होता. "तुला मी काय देऊ? तुला मी सुखी कसं करू?" यमाचे डोळे दयेनं तुडुंब भरले होते. तो पुढे हळूच म्हणाला, "बाळ, तू फार फार सुखी होणार

आहेस."

सावित्री यावर काहीच बोलली नाही. तेव्हा यमाच्या काळजातून कळ उठली. त्याला कळून चुकलं की आपल्या वरांचं, आपल्या देणग्यांचं कसलंही कौतुक तिला नाही. तिचं मन सत्यवानात काय ते गुंतलेलं होतं.

यमाचे विचारचक्र सुरूच होते. "हिला काय हवं असेल बरं? मूल्यवान दुर्मिळ रत्न? सोनं? रूप? छे! छे!" कपाळाला आठ्या खालून तो मनात म्हणाला. "संपत्तीचा, लक्ष्मीचा तिला जराही मोह नाही. मग तिला काय कुठलं तरी साम्राज्य द्यावं? अपार सत्ता द्यावी? पण छे! या गोष्टीही तिच्या लेखी कवडीमोल आहेत. मग तिला काय द्यावे?"

इतक्यात त्याला एक कल्पना सुचली. हर्षानं चुटकी वाजवीत तो आपल्याशीच बोलला. "बाईमाणसाला काय हवं असतं ते मला पक्कं माहीत आहे. स्त्रीला मुलं हवी असतात. तिला मातृत्वाचं सुख हवं असतं."

आपल्याला हे सत्य उमगल्याबद्दल यमाला धन्य वाटलं. तो स्वतःचेच कौतुक करत होता. "अहाहा! देव होणं किती भाग्याचं आहे तरी. देव व्हावं नि माणसाना वर द्यावेत."

मग मोठ्या डौलात, देवाला शोभेशा थाटात त्यानं आपला उजवा वरद हस्त वर केला. अत्यंत शांत, गंभीर

आवाजात त्यानं शब्द उच्चारले.

"सावित्री, तुला मातृत्वाच्या आनंदाचा अनुभव येवो. मुली, तुझी मुलं तुला सुख देणारी होवोत." गर्वभरानं आपलं मस्तक त्यानं ताठ वर केलं नि डोळे मिटून घेतले. जणु त्याला स्वप्नच पडत होतं. मग त्याच्या तोंडून निर्मळ खळखळ हास्याची लाट बाहेर पडली. त्याने डोळे उघडले. आता तो भांबावला होता.

"यमराज" सावित्री हसत हसत बोलली. "मला मुलं व्हायची तर सत्यवान परत माझ्याकडेच यायला नको का? सत्यवान हेच माझ्या मुलांचे वडील होतील अशी शपथ मी घेतली नव्हती का? आपण सत्याचे, धर्माचे देव आहात. सत्य आपल्याखेरीज दुसऱ्या कुणाला बरं चांगलं कळतं?" आपले हात त्याच्यापुढे पसरून ती हसत म्हणाली, "यमदेवा, आता सत्यवानाच्या गळ्याभोवतालचा फास काढण्याखेरीज तुम्हाला दुसरा मार्गच नाही."

यमाने काहीतरी बोलण्याकरता तोंड उघडलं. पण तो आश्चर्यानं एवढा थक्क होऊन गेला होता की त्याच्या तोंडून शब्दच फुटेना. मग त्याच्या मनात काहीतरी उलथापालथ झाली नि जो अतिशय हर्षाने जोराजोरात हसतच सुटला. त्या सातमजली हास्यानं त्याच्या निबर गालांवरून अश्रूचे ओघळू वाहू लागले नि डोक्यावरचा

मुकुट डळमळला.

यमानं आपली आसवं पुसली. "सावित्री, तू म्हणतेस ते बरोबर आहे. सत्यवानाच्या गळ्याभोवतालचा फास काढून घेऊन त्याला जिवंत करण्याखेरीज मला दुसरा मार्गच नाही."

थोड्या वेळानं तो गंभीर झाला आणि म्हणाला, "मेलेला मनुष्य यमलोकातून जिवंत होऊन परत फिरला आहे असं यापूर्वी कधीच झालेलं नाही."

सावित्रीची इच्छा पूर्ण झाली. आपल्या पतीला यमदेवापासून सोडवून तिनं परत आणलं होतं. काही क्षण ती हसतच राहिली. पण लगेच तिचे डोळे भरून आले. तिला रडू आवरेना. आसवांनी डबडबलेल्या डोळ्यांनी तिनं यमान सत्यवानाला मुक्त केलेलं पाहिलं.

"बाळ, माझे आशीर्वाद तुझ्या पाठीशी आहेत" आशीर्वाद देताना यमाचं हृदय भरून आलं होतं. त्याच्या डोळ्याच्या कडा भिजू लागल्या होत्या. हा भावनांचा उत्कट अनुभव यमाला प्रथमच आला. अश्रू माणसासाठी असतात आणि तो देव होता. परंतु आपल्याला हा विलक्षण अनुभव आला त्याचं त्याला वाईट वाटलं नाही.

सडपातळ लहान सावित्री दूर दूर चालली होती. तिच्या मागून सत्यवान स्वप्नात चालावं तसा चालला

आईला मुलगे झाले. अश्वपतीच्या राज्याला वारस मिळाले.

आणि सावित्री? आयुष्यभर सुख तिला साथ देत राहिलं. सत्यवानाचं तिच्यावर प्रेम होतं. अशी पत्नी मिळाली म्हणून तो स्वतःला धन्य समजत असे.

मग सावित्रीला तरी आणखी काय हवं होतं? 'जीवन मधुर आहे. पण ते कायम टिकणारं नाही ' हा विचार सतत तिच्या मनात यायचा.

आणि मग एक दिवशी व्हायचं तेच झालं. यमराज त्यावेळी दोन जीवांना नेण्यासाठी स्वतः आला. सावित्रीला आणि सत्यवानाला. त्या दोघांचे आत्मे त्याच्याबरोबर मोठ्या आनंदाने यमलोकात गेले. एकमेकांच्या हातात हात घालून ते जोडपं तिथे गेलं. कित्येक वर्षापूर्वी असेच हात हातात गुंफून इथूनच ती दोघं मानवांच्या लोकात परत गेली होती.

यम आणि मार्कंडेय

अनेक युगांपूर्वीची गोष्ट आहे. एक वयस्कर दांपत्य होतं. त्यांना मूलबाळ काहीं नव्हतं. दोघानांही मूल हवं होतं. तेव्हा त्यांनी देवाची आराधना करायला सुरवात केली.

अशी कांही वर्ष गेली आणि एके दिवशी त्यांची तपश्चर्या फळाला आली. देव प्रसन्न झाले व त्या दोघांपुढे प्रगट झाले. "तुम्हाला आशिर्वाद देण्यासाठी आम्ही आलो आहोत. तुम्हाला आम्ही वर देणार आहोत. सांगा काय हवं तुम्हाला?" एवढे बोलून देवांनी आशीर्वाद देण्यासाठी हात उंचावला.

देवांचा वर म्हटला की माणसाच्या साऱ्या अप्राप्य इच्छाही पुऱ्या होतात हे त्या नवरा बायकोला चांगलंच माहित होतं. देव प्रसन्न झाल्यावर संपत्ती, भाग्य, साम्राज्य, सत्ता, यश सारं कांही भरभरून मिळतं हे माहित असूनही देव समोर 'वर मागा' म्हणत उभे रहाताच ते दांपत्य गांगरलं. त्यांच्या तोंडून शब्द फुटेना.

पण देवांचं हसणं मायाळू होतं. "सांगा ना, तुमची इच्छा काय आहे?" देवांनी आग्रह केल्यावर हळूहळू ती

दोघं बोलती झाली.

"देवा, आम्हाला मुलं हवीत. आमचं एकटेपणाचं जिणं सुखी करण्यासाठी मुलं हवीत. मेल्यावर स्वर्गप्राप्ती व्हावी म्हणून आम्हाला मुलं हवीत."

देव उत्तरले, "देव वर देतात पण त्यात ते अट घालतात. देव माणसांच्या इच्छा पुऱ्या करतात पण माणसांची परीक्षा देखील घेतात. आता आम्ही तुम्हा दोघांची परीक्षा घेऊ नि नंतरच तुम्हाला वर देऊ."

"आता तुम्हाला पुष्कळ मुलं हवीत की एकच मुलगा हवा, ते तुम्ही सांगा." देवांचे हे बोलणे ऐकल्यावर त्या दांपत्याला जणू स्वर्गच हाती आल्यासारखं वाटलं. त्यांना मुलं फार आवडायची. देवांनी शंभर मुलं दिली असती तरी त्यांना आनंदच झाला असता.

पण देवांचं म्हणणं पुरं झालं नव्हतं. जणू काही त्या माणसांच्या मनातले विचार ओळखून देव म्हणाले, "तुमच्या इच्छेप्रमाणे आम्ही तुम्हाला एक मुलगा देऊ किंवा शंभर मुलगे देऊ. जो एकच एकच मुलगा असेल तो अत्यंत गुणी असेल. शंभर मुलगे हवे असले तर त्यापैकी प्रत्येक मुलगा शंभर वर्ष जगेल. पण ते सारे मुलगे द्वाड आणि दुष्ट असतील. तुम्हाला काय हवं बोला?"

त्या प्रश्नाचं साधंच उत्तर आहे असं त्या दोघांना

वाटलं. आपण एकच मुलगा घेऊ हे तर अगदी उघड आहे.

पण देवांनी आपलं बोलणं अजून थांबवलं नव्हतं. "थांबा" देव हसून म्हणाले. त्या हसण्यात अलिप्तपणा होता, गूढ होतं. "दुसरंही एक आहे. तुमच्या या एकमेव मुलाचं आयुष्य फक्त सोळा वर्षांचंच असेल. तुमचे शंभर दुष्ट मुलगे मात्र शंभराहून अधिक वर्ष जगतील. तेव्हां आता विचार करा नि सांगा. तुम्हाला दीर्घायुषी, ऐश्वर्यशाली शंभर दुष्ट मुलगे हवेत की एकच गुणी पण सोळा वर्षांचं आयुष्य असलेला गुणसंपन्न मुलगा हवा."

त्या नवराबायकोंनी एकमेकांकडे पाहिलं. नंतर हताशपणे देवांकडे पाहिलं. देव काही क्रूर नव्हते खास. अजून त्यांच्या चेहऱ्यावर स्मित होतं. ते वृद्ध दांपत्य शांत होतं. त्यांची पापणीही लवत नव्हती. "सांगा, सांगा" एवढंच देव हसत म्हणाले. त्यांचे आवाज अगदी मृदू होते. अखेर त्या वृद्ध दांपत्यानं आपला निर्णय जड अंतःकरणाने देवांना सांगितला.

"आम्हाला जीवन चांगुलपणानं जगणारा एकच मुलगा हवा. तो सोळा वर्षंच जगायचा म्हणता तर तसंच होऊ दे कारण तशीच दैवाची इच्छा आहे."

देव प्रसन्न होऊन उत्तरले, "तुमचा निर्णय अगदी

योग्य आहे." त्या जोडप्याला वर देऊन ते अंतर्धान पावले.

कांही काळाने त्या दांपत्याला पुत्ररत्न प्राप्त झालं. त्याचं नांव त्यांनी मार्कंडेय अस ठेवलं.

मार्कंडेय वाढू लागला तसंतसं देवांचं बोलणं खरं होतं हे त्याच्या आईबापांच्या प्रत्ययाला आलं. तो मुलगा तेजस्वी होता. त्याच्यात मूर्तिमंत आनंद भरलेला होता. माणसंच काय पण पशुपक्षी देखील त्याच्या तेजानं भारले जायचे. तो जन्मला तेव्हाच पृथ्वी आणि स्वर्ग हसताहेत असं त्याच्या आईला वाटलं. वडिलांच्या हातात बाळाला देताना तिचं हृदय आनंदाने भरून आलं. वडिलांच्या शांत, विनयशील मुद्रेवरसुद्धा अभिमान उमटला.

शेजारी - पाजारी त्या सोनचाफ्यासारख्या गोऱ्या गोमट्या बाळाला पाहून त्याचं कौतुक करू लागले. साऱ्यांचाच तो लाडका होता. मार्कंडेय देखणा तर होताच पण चांगला धष्टपुष्टही होता. गावातल्या मुलांबरोबर तो खेळायचा.

सकाळच्या शीतलवेळी त्याचे वडील त्याला हाती धरून शेतात न्यायचे. तिथ ते दोघं धान्य कसे पेरतात, बैल जमीन कसे नांगरतात ते पाहायचे. ऋतु-ऋतूत होणारा बदल ते बघायचे. रोपं पिकून शेतं सोनेरी झाली

की मार्कंडेय आपल्या गावकऱ्यांना मळणी वगैरे करायला मदत करायचा.

संध्याकाळी दिवेलागणीच्या वेळेला गाईंना गोठ्यात नीट बांधून मार्कंडेयाची आई त्याला बोलावी. त्याला गाणी शिकवी. देवादिकांच्या गोष्टी सांगे. वीरपुरुष, भुतंखेतं, चेटक्या यांच्या गोष्टी ती त्याला रोज सांगायची. शिवाय पशुपक्षी, जादूटोणा आणि जगात भरलेलं अद्भुत आणि गूढ यांचीही ओळख ती आपल्या मुलाला करून द्यायची.

मार्कंडेयानं आईवडिलांना जे सुख दिलं तसं त्यांनी पूर्वी कधीच अनुभवलं नव्हतं. पण या सुखाच्या बहरातसुद्धा दुःख त्यांचे मन आतून पोखरतच होतं. देवांचं भाकीत विसरणं त्याना कसं शक्य होतं?

मार्कंडेयाला आपल्या आईबापांचं दुःख जाणवलं. तरीपण त्याचं कारण त्याला कळलं नाही. या दोघांच्या मनावर कसलं दडपण आहे? आई एकाएकी बाजूला तोंड करून डोळे का पुसते? बाबांच्या डोळ्यात काळजीचं सावट का दिसतं? हे त्याला समजेना.

एकदा मार्कंडेयाला मध्यरात्रीच्या सुमारास जाग आली. त्याला आपले आईबाप दबल्या आवाजात रडताहेत हे त्याला उमगलं. तो कान देऊन त्यांचे संभाषण ऐकू लागला.

"मार्कंडेयाच्या गळ्याभोवती आणि मनगटाभोवती गंडेदोरे नि ताईत बांधले की त्यांच्या शक्तीमुळे मरण टळेल" असं ती दोघं पुटपुटल्याचं मार्कंडेयाने ऐकले. गेले काही दिवस ज्योतिषी आणि दाढीवाले साधू यांची सल्लामसलत आपले आईवडील वारंवार घेतात हे त्याच्या लक्षांत आलं होतं. मात्र त्या रात्री हे सारं कशासाठी चाललं आहे ते त्याला विजेसारखं क्षणात उमगलं.

जेव्हा मार्कंडेय आईवडिलांशी याबाबत बोलला तेव्हा मग त्यांनीच सर्व कांही उलगडा केला. 'होय रे बाळा, तुझ्या मरणाचच भय आम्हाला वाटतं."

"मरणाचं काय?" मरण? मरण तर मार्कंडेयानं पाहिलंच होतं. भराला आलेल्या पानाचं नि फुलाचं मरण पाहिलं होतं. पक्षांचं नि फुलपाखरांचं मरण त्यानं पाहिलं होतं. देवाचं नांव घेत स्मशानाच्या वाटेने जाणारी प्रेतयात्रा त्यानं नि त्याच्या मित्रांनी कैकदा पाहिली होती. कधी कधी प्रेत पांढऱ्या वस्त्रात गुंडाळलेलं असायचं तर कधी ते प्रेतवस्त्र गडद तांबडं किंवा पिवळं असायचं. त्याच्यावर झेंडूच्या नि जाईच्या फुलांच्या माळा घातलेल्या असायच्या. कधी कधी या यात्रेत लोक नाचत असत, गात असत. पण एक मात्र खरं की प्रेत यात्रेतील माणसं बहुतेक रडत रडत जात असत.

लोक मरणाबद्दल काय बोलतात ते त्यानं ऐकलं होतं. 'मृत्यू क्रूर आहे, मृत्यू दयाळू आहे, मृत्यू भयंकर असतो, मृत्यू म्हणजे अखेर, साऱ्याच गोष्टींची समाप्ती. मृत्यू म्हणजे एक मोठं गूढ आहे कारण मेल्यावर काय होतं ते कुणीच सांगू शकत नाही. मृत्यू दुःख देतो, रडवतो, मेलेल्या माणसाचे आप्त त्याच्या विरहाच्या दुःखान जळून निघतात. मरणाला सारेच घाबरतात. मरणाचं नांव सुद्धा घ्यायचं लोक टाळतात. आपले आईबापसुद्धा असेच घाबरले आहेत.' एक ना अनेक गोष्टी मार्कंडेयान पाहिल्या व ऐकल्या होत्या.

मार्कंडेयानं ओळखलं की ज्यांना आपण जाणते समर्थ आणि सूज्ञ समजतो ते शहाणेसुरतेसुद्धा मृत्यूपुढे हतबळ झालेले दिसतात. आपल्या आईपडिलांपाशी याचं उत्तर नाही. त्यांची तर भितीनं गाळणच उडाली आहे. आता आपल्याआपणच उत्तर शोधून काढायला हवं नि त्यांना धीर द्यायला हवा असे त्यानं मनावर घेतलं. आपण मरता कामा नये. आईबापासाठी आपण जगलंच पाहिजे असा विचार त्याने केला.

मार्कंडेय आता आपल्या सवंगड्याना सोडून एकटाच भटकू लागला. त्याच्या डोक्यात प्रश्नांनी थैमान घातलं होतं. त्याला निवांतपण हवं होतं. एकांतवासात स्वतःशी झगडून त्याला प्रश्नांची उत्तरं मिळवायची होती.

एक दिवस त्याला असा साक्षात्कार झाला की शिव हा अनाद्यनंत आहे. त्याच्या तांडव नृत्यानं विश्वाचा अंत होतो, प्रलय होतो आणि फिरून नव्यानं विश्वही तोच उत्पन्न करतो. अशा त्या शिवाची गाठ आपण घेतली तर तोच मरणाला काय उत्तर असतं ते आपल्याला सांगेल. तेव्हा शिवाचा शोध घ्यायचा हे त्यानं ठरवलं.

मार्कंडेयानं हा निश्चय करायचा अवकाश की तो शिव लिंगापुढे डोळे मिटून ध्यानस्थ बसला. बाळपणाच्या साऱ्या खोड्या विसरून, मस्ती टाकून तो ध्यानात मग्न झाला. दगडातून कोरलेल्या मूर्तीप्रमाणे तो पोर निश्चल बसला. अहोरात्र तो बसून होता. दिवस लोटले, आठवडे उलटले. खाणंपिणं टाकून तो तसाच बसला. अन्न पाण्याची गरजच त्याला वाटली नाही.

होता होता महिने उलटले. ऋतू बदलत राहिले. त्याच्या भोवती गवतांचं रान माजलं. त्याच्या डोक्याभोवती किडे भुणभुणू लागले. त्याच्या अंगावरुन साप वरखाली सळसळत जाऊ लागले. पण त्याला कशाचंही भान नव्हतं. त्याचं मन फक्त महादेवात गुंतलं होतं. त्याचे आईवडिल बिचारे डोळ्यात प्राण आणून हे सारं बघत होते. ते कसेबसे जगत होते.

मार्कंडेयाच्या तपाची झळ स्वर्गातल्या देवांना

लागली. खाली पृथ्वीकडे पाहून ते विचार करू लागले. "काय मार्कंडेय तप करतो आहे? माणसं ध्यानात इतकी मग्न होत नाहीत की इतकी तीव्र आराधनासुद्धा करत नाहीत. जर माणसांचं चित्त अमरणाची ध्यान धारणा करण्यात गुंतलं तर आपलं काय होईल?"

'आम्ही देव, माणसाना सर्व चांगल्या गोष्टी देतो. धन देतो, ऐहिक सुख देतो, सत्ता देतो. लोक या गोष्टी हव्यात म्हणून आमची आराधना करतात. जर माणसांना आम्ही दिलेले वर, आमच्या देणग्या, निरर्थक आहेत असं कळलं तर आमच्या सामर्थ्याचा उपयोग काय? जर माणसांना अमरत्व ही एकच गोष्ट सत्य आहे असं कळलं तर आमची गत काय व्हायची?' या स्वरूपाचे विचार देव करत होते.

पण तेवढ्यात देवांना आठवलं की मार्कंडेय अल्पायुषी आहे. मग ते निश्चिंत झाले. लवकरच मार्कंडेय सोळा वर्षांचा होणार होता. सोळावं वर्ष लागलं की तो निश्चित मरणारच होता हे लक्षात येऊन देव स्वस्थ बसले.

मार्कंडेय सोळाव्या वर्षी मरणार हे आठवून त्याचे आईवडिल देखील आपल्या झोपडीत रडत होते. यमराज देखील इतर देवाप्रमाणेच स्वस्थ झाला. मार्कंडेयाभोवती आपला पाश टाकण्याची वेळ जवळ आली आहे याची

त्याला आठवण झाली. इकडे ध्यानात मग्न असलेल्या मार्कंडेयालाही आतल्याआत जाणवलं की आपल्या जीवनात फार मोठा बदल होतो आहे.

मार्कंडेयाला सोळावं वर्ष लागलं त्यावेळी यमाचे दूत थोड्या अंतरावर उभे राहिले. मार्कंडेयाला त्यांनी हाक मारली, "ये, मार्कंडेया, आमच्याकडे ये. तुझी वेळ झाली." पण ध्यानात मग्न असलेल्या मार्कंडेयाला त्यांचं बोलणं ऐकू आलं नाही. "ये मार्कंडेया, ये" फिरून त्यांनी त्याला हाक मारली. पण त्यान उत्तर दिलं नाही. तो निश्चल बसून राहिला. यमदूत आश्चर्यानं त्याच्याकडे बघतच राहिले.

खरं म्हणजे यमदूतांनी आज्ञा केली की, तिचं क्षणार्धात पालन व्हायचं, असा त्यांचा अनुभव होता. मार्कंडेयाच्या मुखावर जी शांती होती. जे सामर्थ्य होतं ते पाहून त्यांची चलबिचल व थरकाप उडाला. त्यांचे चेहरे पडले. ते त्याच्याजवळ जायला धजावले नाहीत.

यमदूत मागे फिरले. जीव मुठीत घेऊन यमराजासमोर उभे राहून कबुली दिली. "महाराज मार्कंडेय शिवलिंगासमोर ध्यानस्थ बसला आहे. त्याला हात लावायला आम्हाला धीर होत नाही."

यमानं पाहिलं तर यमदूतांची तोंडं पांढरी

फटफटीत पडली होती आणि त्यांची बोबडी वळली होती. हा काय प्रकार आहे ते त्याला कळेचना. "माझ्या सत्तेचा धिक्कार? माझी अवज्ञा?" असं जोरात म्हणून यमराज स्वतः उठून ताठ उभा राहिला. त्याच्या भोवतालची भुतं यमदूतांना ओरडत आरडत शिव्या देऊ लागली.

खुद्द यमदेवान आपल्या दूतांना धिक्कारले. "मूर्खांनो, तुम्हाला स्वाभिमान आहे की नाही? एका लहान पोरापुढे तुम्ही नांगी टाकलीत?" यमदूत हादरले ते हादरलेच होते. भेदरून गेलेल्या त्या यमाच्या सेवकांनी क्षमायाचना केली. "क्षमा करा. महाराज, हे काम आम्हाला पेलणार नाही." यमान त्यांना मूर्ख, भ्याड अशी दूषण दिली. पण ते होते तसेच राहिले.

अखेर यम समजून चुकला. 'हे काम आपल्यालाच पार पाडलं पाहिजे. त्यापायी वेळ फुकट चालला होता. कुठल्याही प्राण्याची मरणाची वेळ कधी चुकता कामा नये. ठरल्या वेळेपेक्षा कुणीही जास्त जगू शकत नाही. जगता कामाच नये नि हा तर अटळ विश्वनियम आहे.'

यमानं ज्या ग्रंथात आपल्या बळींच्या नावांची यादी लिहिली होती तो ग्रंथ उचलला. झळाळणारी अंगठी घातलेलं त्याचं बोट मार्कंडेयाच्या नांवासमोर थांबलं. "सोळावं वर्ष लागलं की मरण" असं त्यानं हळूच

वाचलं. त्याला मरण यावं ही देवांचीच आज्ञा होती.

यमान आपल्या बांधलेल्या रेड्याला सोडलं. त्यानं भिंतीवरचा फास घेतला. गळ केलेली दोरी घेतली. आता मरणाचे चौघडे वाजू लागले. गिधाडं आकाशांत घिरट्या घालू लागली. त्यांचा कर्कश आवाज दशदिशात घुमू लागला. आपल्या रेड्यावर बसून यम मार्कंडेयाकडे निघाला.

हातात फास घेतलेल्या स्थितीत तो मार्कंडेयाजवळ येऊन थांबला. रेड्यावरून खाली उतरून रेड्याला त्यान एका झाडाला बांधलं. दोरी घेऊन तो पुढे सरसावला थोडी पावलं टाकून तो मुद्दामच थांबला. आपले लाल कडा असलेले डोळे मार्कंडेयावर रोखून त्यानं शब्द उच्चारले. "तरुण मर्त्या, तुझी घटका भरली आहे. सारं सोडून तुला माझ्या मागून आलं पाहिजे." यम बोलला त्याच क्षणी मार्कंडेयाला सोळावं वर्ष लागलं. डोळे बंद करूनच मार्कंडेय गंभीरपणे हसला.

"यमा, मी प्रार्थना करतोय. माझी प्रार्थना संपेपर्यंत तू जरा थांब."

"थांब, थांब असंच म्हणालास ना तूं? यम कुणासाठीही थांबत नसतो हे तुला माहीत नाही काय? तू मला ओळखत नाहीस का?"

"मी ओळखतो" मार्कंडेयाने हसून ग्वाही दिली.

"तू यम आहेस. मृत्यू आहेस. तू फार थोर आहेस. बलिष्ट आहेस हे सारं मला माहित आहेच. पण अनाद्यनंत शिवापेक्षा कांहीं तू मोठा नाहीस. तू जरा थांब. माझी आराधना संपली की मी येतोच."

यम पुढे होत तुच्छतेने म्हणाला, "हं. अरे, रक्तामासाच्या क्षुद्र प्राण्या. तुझं स्वामित्व कशावरही नाही. तू अगदी एकटा नि दुबळा आहेस. माझी अवज्ञा करायची तुझी एवढी हिंमत? माझ्यापुढे राजे सम्राट शूर योद्धे थरथर कापतात. यम कधी पराभूत होऊन रित्या हातानी परत फिरला आहे?"

मोठमोठ्यानं विक्राळ हास्य करत यमदेवाने मार्कंडेयाच्या गळ्याभोवती फास टाकला. दोरीचं टोक आपल्या हाती धरून हळू आवाजात त्याने मार्कंडेयाला आज्ञा केली. "मार्कंडेया सारं संपला आहे. तू आता माझा झालास. आता माझ्या मागून माझ्या लोकात तुला यायलाच हवं."

नेमकी याच क्षणाला आसमंतात शोकक्षोभाची एक मोठी लाट उसळली. चहुबाजूंनी आक्रंदन सुरू झालं. विरोधाचे हुंकार उठू लागले. चहुबाजूंनी आर्त शोकाचे सूर यमाच्या सभोवार उठले. यमाने मान डोलवली कारण हे आक्रंदन, हे रडके सूर त्याच्या परिचयाचे होते. ज्या ज्यावेळी आपलं प्रिय माणूस मृत्यू पावेल त्या त्यावेळी

ही रडारड नेहमीच चाले.

ते केविलवाणे सूर, ते निषेधाचे हुंकार ऐकून यम अधिकारवाणीने गरजला. "आदेशानुसार जे व्हायचं ते झालंच पाहिजे. ते बदलता येत नाही. चल मर्त्या, चल." यमाने जमिनीवर एक पाय आपटला. तो अधीर होऊन थांबला होता. दूरवरचा तो आक्रोश तसाच चालू होता. यमाला सगळं सारखंच होतं. सारे प्राणी त्याला सारखेच होते. तरी पण तो ऐकत राहिला. 'आताचा हा आक्रोश, हा विलाप वेगळा तर नाही?' यमाच्या कपाळाला आठ्या पडल्या.

आज आपल्याला इतकं अस्वस्थ का बरं वाटतं? हे यमाला समजेना. रडण्याचे स्वर तर चहुंबाजूनी येत होते. त्यात आज मानवी आक्रंदनाची भर पडली होती एवढंच नाही तर सारे अमानवी प्राणीही रडत होते. गवत सुद्धा आक्रंदन होतं, रडत होतं.

"मार्कंडेयाला नेऊ नकोस यमा. त्याला नेऊ नको" सारेजण हेच विनवत होते. खांदे उडवत यम वळला. उसासा टाकीत त्यानं आपण जे केलं होतं त्याचे समर्थन केलं. "दैव आहे. देवाची इच्छा आहे....... कुणीही माणसानं आपल्या आयुर्मर्यादेहून जास्त जगता कामा नये....... कुणीही जगता कामा नये." त्यानं दोरी हळुवारपणे ओढली आणि मग थांबला.

सुंदर, विनयशील, मृदु स्वभावाचा, शूर असा तो मार्कंडेय गळ्यात फास अडकलेल्या स्थितीत आपल्या बरोबर चालला आहे, त्याच्या तेजाने सारा मार्ग उजळला आहे...... असं चित्र यमाच्या डोळ्यापुढे तरळत होतं. खरोखरीच त्याचं मार्कंडेयावर प्रेम जडलं होतं. त्याला मार्कंडेय आपलाच असावा अशी इच्छा निर्माण झाली होती.

"मार्कंडेया" अत्यंत मृदुस्वराने त्याने हांक मारली. पण काहींच घडलं नाही. यमाला कळून चुकलं. मार्कंडेय उठलाच नव्हता तर तो त्याच्याकडे चालत कुठून येणार? "हे शक्य नाही, हे होणेच नाही" आश्चर्यानं भिवया उंचावून यम पुटपुटला.

तरीपण न घडणारच घडलं होतं. मार्कंडेयाच्या गळ्याला फासाचा वेढा होता तसाच होता. यमानं ओढलं तरी काहींच झालं नव्हतं. शिवलिंगासमोर मार्कंडेय ध्यानस्थ बसून होता. यमाच्या आज्ञेचा त्याच्यावर कांहींच परिणाम झाला नव्हता.

यम बुचकळ्यात पडला. हातात धरलेल्या दोरीकडे तो वाकून पाहू लागला. जगाच्या सुरवातीपासून आपण फासानं ओढून घेतलेल्या अगणित प्राण्यांचा चित्रपट त्याच्या मनःचक्षूपुढे झर्रकन सरकला. आताच काय विपरीत घडलं. त्याचा बळी हलला का नाही? काय

चुकलं होतं? यमाच्या अंगात भयाची लहानशी शिरशिरी उठली. त्याने दोरी फिरून खेचली. दुसऱ्यांदा खेचली. पूर्वी असं करायची त्याला कधीच जरूरी भासली नव्हती. परंतु दुसऱ्यांदा हिसका देऊनही कांहींसुद्धा घडलं नाही. यम फिरून फिरून दोरीला झटके देऊ लागला.

यमाचे सेवक भयभीत होऊन त्याच्याकडे बघत होते. त्यांच्या नजरा आपल्याकडे रोखून बघताहेत, आपल्या शक्तीबद्दल, सत्तेबद्दल साशंक होऊन बघताहेत हे त्यानं हेरलं. त्यानं आपला ओठ चावला, जोराने श्वास घेतला आणि फिरून दोरी ओढली. तरीही कांही म्हणता कांही घडला नाही. मार्कंडेय ध्यानस्थ बसला होता. काळ थांबला होता.

"विचित्रच आहे " यम भांबावून, बुचकळ्यात पडून पुटपुटला. पण ही आपली अवस्था कुणाला दिसू नये या इच्छेनं त्यान चोरून आजूबाजूला पाहिलं. हे सुद्धा त्यानं पूर्वी कधीच केलं नव्हतं. त्यातून आज कधी नव्हे ते मागे पाहिलं तर त्याला जे दृष्य दिसलं त्यानं तो दचकला.

मार्कंडेय शिवाच्या पिंडीवर हात ठेवून बसला होता. त्याचे डोळे बंद होते आणि सगळी सृष्टी त्याच्याभोवती गोळा झाली होती. सारे प्राणी तिथे जमले होते. सारे जग 'मार्कंडेयाला यमाच्या पाशातून सोडव' अशी शिवाची

1585

प्रार्थना करीत होते.

"या साऱ्याना मी माझं पाणी दाखवतो" असे म्हणून मनात योजून यमानं मर्त्यांना आपलं भयंकर रूप दाखवलं. मानवानी त्याला ओळखलं. 'मार्कंडेयाला सोडून दे' म्हणून त्यांनी विनवणी केली.

यम हसू लागला. "हे कसं व्हायचं? त्याचं आयुष्य सरलं आहे. माणूस आयुष्याची मर्यादा ओलांडू शकत नाही हा सृष्टीचा धर्म आहे. मूर्खांनों, जा आपल्या घरी जा. मार्कंडेय माझा आहे."

"आम्हाला सृष्टीच्या धर्माशी कांहीं करायचं नाही." लोक म्हणाले. "मार्कंडेय आमचा आहे. आमचं त्याच्यावर प्रेम आहे. तो चांगला आहे. शुद्ध आहे. तरुण आहे. निरागस आहे. मरायला त्याचं वय लहान आहे. यमा, त्याला सोडून दे."

यम हसून उद्गारला, "ही देवांची आज्ञा आहे. कुठलाही माणूस स्वतःची आयुर्मर्यादा पलीकडे जगू शकत नाही. हा विश्वाचा नियमच आहे.'

"पण मरायला मार्कंडेयाचं वय झालं आहे का? तो किती लहान आहे." लोक स्फुंदू लागले.

"प्रकृतीच्या नियमाप्रमाणेच सारे जीव जगतात, साऱ्या वस्तू जगतात. नक्षत्रं नियमाला धरूनच चालतात. देवानांही हा नियम चुकलेला नाही. मी स्वतः मरणाचा

देव आहे. पहिला मर्त्य मीच. पण या मरणाच्या देवाला देखील एक दिवस फिरून मरावंच लागणार आहे. हा सृष्टीचा सर्वश्रेष्ठ नियम आहे " यम म्हणाला.

"पण मार्कंडेय," इतकेच म्हणून सुरवात करत लोकानी आकाशाकडे नजर लावून प्रार्थना केली. त्यांच्या प्रार्थनेतलं सामर्थ्य विलक्षण होतं. यमानं पाहिलं की त्यांच्या प्रार्थनेच्या शक्तीमुळे स्वर्गाचं दार उघडलं गेलं आणि शिव कैलासावरून उतरून मार्कंडेय बसला होता तिथे आला. मार्कंडेयाला गळ्याला यमाचा फास लागलेलाच होता.

लोकांनी आश्चर्य पावून आरडा ओरडा केला. 'देवा कांहीं तरी करा. मार्कंडेयाला वाचवा" त्यांच्या आवाजात कळवळा होता.

"वाचवू? मृत्यूपासून वाचवू? पण ते बरं होईल कां?" शिव साशंक होऊन म्हणाला.

"शिवा, आमचं मार्कंडेयावर प्रेम आहे. तो फार चांगला आहे. तो आमच्यातून गेला तर आमचं काय होईल?"

पण शिव अजून साशंकच होता. त्रस्त होता. "मरण हा जीवनाचा एक भाग आहे. त्या दोघांना वेगळं कसं करता येईल?" शिवानं प्रश्न केला. पण लोक हट्टालाच पेटले. 'मार्कंडेयाला वाचवा' हेच त्यांचं

पालुपद होतं.

"मी काय करावं असं तुमचं म्हणणं आहे?" शिवानं विचारलं. लोक एकमेकाकडे पाहू लागले. ते विचारात बुडून गेले. मग त्यातले कांही सूज्ञ उत्तरले, "देवा असं करा ना. तुम्ही पृथ्वीवरून मरणच काढून टाका. मार्कंडेयासाठी एवढं करा." झालं. लोकांनी उत्साहानं ही कल्पना एकमुखानं उचलून धरली. त्यांच्या ललकाऱ्यानी आकाश दुमदुमलं. "शिवा, महादेवा मरणाचा उच्छेद करा. मृत्युची कायमची हकालपट्टी करा. त्यानंच ही कोंडी सुटेल."

लोक स्वतःच्या कल्पनेवर खूष होऊन गेले. काय नामी कल्पना आहे! किती चतुरपणे केलेली ही सुसूत्र आखणी तरी. मृत्यूचा उच्छेद. दुःखाचा नि अश्रूंचा शेवट. याच्यासारखी उत्कृष्ट योजना दुसरी नाहीच. मृत्युचा नायनाट. मरणाचं मरण.

यमाची तुच्छ वृत्ती त्यांनी पाहिली. पण त्याच बरोबर किंचित् भयदेखील लोकांना त्याच्या डोळ्यात डोकावताना दिसलं. शिव साशंक वृत्तीने 'नाही' म्हणून मान हलवीत होता. शिव यमाकडे वळला आणि त्याला त्यानं विनंती केली. "यमा, तुझ्या नेहमीच्या नियमाकडे जरा दुर्लक्ष कर. मार्कंडेयाला एवढी सूट दे."

पण यमानं आपला चेहरा जसाचा तसा ठेवला. त्याच्यावरची एकही रेषा बदलली नाही. शिवाकडे पहात उर्मटपणे यमानं प्रत्युत्तर केले. "या बाबतीत अपवाद नाही. सूट नाही. हा नियम दैवाचा आहे आणि दैव तर कुणालाही बदलता येत नाही."

"कुणालाही नाही?" शिवानं यमाच्याच शब्दांचा पुनरुच्चार करीत प्रश्न केला. मग एकदम सारं स्तब्ध झालं. माणसांचे श्वास रोखले गेले. झाडांच्या पानांची सळसळसुद्धा थांबली. शिव पुढे म्हणाला," यमा, मर्त्य मानवानी दैवाशी मुकाबला करून त्याची गती बदलली याची जाणीव तुला आहे का?"

मार्कंडेय माझा आहे" यमानं विषय टाळला. "त्याला माझ्यामागून यमलोकात यावंच लागेल."

शिव अत्यंत शांतपणे म्हणाला, "तुला मार्कंडेयाला नेता यायचं नाही." हे बोलताना शिवाच्या दोन्ही डोळ्यात प्रखर सूर्यासारखं तेज होतं.

"यमाला कोण थांबवणार?" गर्वाने यम फणफणला होता. त्या मदात त्याने दोरी ओढण्यास सुरवात केली. आता तो मार्कंडेयाच्या अगदी जवळ येऊन ठेपला होता.

"अरे, क्षुल्लक क्षुद्र देवा, यमा. तू माझी अवज्ञा करणार काय?" शिव शांतपणे अगदी खालच्या आवाजात उद्गारला.

यमानं आपल्या मिशांना पीळ दिला. त्याचे भयंकर डोळे गर्वाने धुंदावले. 'मी मृत्यूचा देव आहे. अंतक आहे" तो गरजला. "मी काहीं कुणाचा गुलाम नाही. मागे हट. शिवा, मार्कंडेय माझा आहे. आम्हा दोघांच्यामध्ये तू देखील येता कामा नयेस."

"येता कामा नये" शिवानं यमाला त्याच्याच शब्दात त्याला चिडवत म्हटलं. "येता कामा नये, असंच तू म्हणालास ना यमा? अरे, क्षुल्लक देवा. तू इतका गर्विष्ठ, इतका उन्मत्त झालास काय? तुझ्या सत्तेचा मद तुझ्या मस्तकात शिरला की काय?"

"तू काय करणार?" यम हट्टाला पेटला होता. या वेळी तो फारच भयंकर दिसत होता. त्याची भव्य आकृती विश्व व्यापून राहिल्यासारखी दिसत होती. "मरण सर्वत्र आहे. शिवा, तू अनंतेश्वर असलास तरी काय करू शकतोस?"

"यमा, सांभाळून रहा" शिवानं त्याला इशारा दिला. "मार्कंडेयासाठी मी लोक म्हणतात तसंच करीन. मरणाचा नायनाट करीन. तुझी सत्ता, तुझं साम्राज्य कायमचं नष्ट करीन. तुझा गर्व धुळीला मिळवीन."

हे ऐकून यम तुच्छतेनं हंसला. "माझी सत्ता कधीच संपुष्टात येणार नाही." त्याच्या बोलण्यात छद्मीपणा होता.

लोक उत्सुकतेनं उभे होते. आता होणार तरी काय? दोघे बलिष्ट देव एकमेकासमोर विरोधात उभे ठाकले होते. त्यांच्या प्रचंड आकारांनी पृथ्वी नि आकाश व्यापून टाकलं होतं. त्या दोघांच्यामध्ये मार्कंडेय डोळे मिटून ध्यानस्थ बसला होता. या संघर्षात भेदरून गेलेले किरकोळ मानव मात्र कोणाच्या खिजगणतीतही नव्हते.

लोकांनी पाहिलं तेव्हा शिव पुढे सरकत होता. आपला डावा पाय उचलून त्याने यमाच्या छातीवर लाथ मारली. यमदेव, मृत्यूचा तो सम्राट खाली आदळला. त्याच्या डोकीवरचा मुगुट हलला आणि धुळीत पडला. शिव त्याच्यावर पाय ठेवून उभा राहिला.

"यमा, तुझी सत्ता तुझ्यापासून काढून घेतली आहे" शिवाचा आवाज चौफेर घुमला. "इथून निघ. तोंड झाकून चालत हो. आजपासून मरण नाहीसं झालं आहे. यापुढे मृत्यू होणार नाही."

हळूहळू, मोठ्या कष्टानं उठून यम लटपटत व झोकांड्या खात कसातरी उभा राहिला. आता तो अगदी आक्रसून गेला होता. घाबरला होता. एखाद्या भेदरलेल्या सावजासारखा दिसत होता.

"तसंच होऊ दे " यम पुटपुटला. त्याच्या तोंडून बाहेर शब्द फुटत नव्हता. "तसंच होऊ दे, शिवा तसंच होऊ दे बरं. यापुढे मृत्यू रहाणार नाही." नंतर मान

खाली घालून रेड्याला हाकलत यमानं आपली पावलं यमलोकाकडे वळवली.

"मरण नाही. मरण मेलं " लोक अत्यानंदाने आरोळ्या मारू लागले. "आमची प्रार्थना फळली. आमचा जय झाला. मार्कंडेयानं मरणाला जिंकलं आहे. तेव्हां आता यापुढे कुणीही मरणार नाही."

"होय, मृत्यूला जिंकलं आहे. पण हा उतारा वाटतो तितका सोपा नाही " शिवानं इशारा दिला.

पण लोक आता आनंदाने नाचण्यागाण्यात इतके गुंग झाले होते की त्यांना शिवाचे हे उद्गार ऐकूच आले नाहीत. आनंदानं ते इतके बेहोष झाले होते की शिव कैलासाला कधी निघून केला हेही त्यांच्या लक्षात आलं नाही.

लोक हा विजयोत्सव साजरा करत असताना मार्कंडेय मात्र शिवाचा पिंडीसमोर ध्यानस्थ बसला होता.

यम यमलोकात परतला. पण आता त्याचे दिवस रिकामपणात जाऊ लागले. त्याला काहीच काम उरलं नाही. आता मृत्यूला जीव घेता येणार नव्हते. सारे जीवजंतू, सारी मानवजात आता अखंड जिवंत रहाणार होती. आता मरण नाही. फक्त जन्म तेवढा राहिला. प्रारंभ आहे पण अंत नाही. फक्त आहे ते तसंच अखंड चालू रहाणारं होतं आणि तसंच झालं. माशांचं

अंड्यातलं जीवन, गर्भातलं उसळतं जीवन, रसरसलेलं जीवन, प्रवाही जीवन सारखं चालू होतं. हवेतल्या प्रत्येक परमाणूतलं जीवन, पाण्याच्या प्रत्येक थेंबातलं जीवन, सुफळ समृद्ध पृथ्वीच्या प्रत्येक रंध्रांतलं जीवन चालूच राहिलं.

दिवसामागून रात्र नि रात्रीमागून दिवस असं सृष्टीचं रहाटगाडगं चालू राहिलं.

आठवडे गेले. महिने उलटले. ज्यांनी मृत्यू नको म्हणून शिवाकडे मागणी केली होती, त्यांनी पाहिलं की सर्वकडे निपज होत होती. वस्तुजात वाढत होती. वनस्पती वाढत होत्या. कीटकसृष्टी वाढत होती. सरपटणारे प्राणी वगैरे वाढत होते. पशु पक्षी वाढत होते. माणसांची संख्या वाढत होती.

ही वाढ शाश्वत होती. अखंड होत होती. तिला मरण नव्हतं. झाडावर नवी पालवी फुटे. पण जुनी सुकलेली, झडलेली पानं गळत नव्हती. फांद्यांना लटकत ती तशीच राहिली होती. ती दिवसेंदिवस विदीर्ण होत होती पण ऐन हंगामात गळत नव्हती. फुलं फुलत, फळं पिकत आणि तशीच सडत, किडत रहात. पण तरी ती तशीच जीव धरून होती.

कीटक प्रसवत राहिले. त्यांच्या झुंडीनी सूर्यप्रकाश झाकळून गेला. पशु-पक्षी यांची निपज बेसुमार वाढली.

माणसांची देखील तीच गत झाली. त्यांची संख्या बेसुमार वाढली. कोटीकोटीनी वाढली. दररोज त्यामध्ये भर पडत होती. म्हातारेकोतारे, आजारी व्याधिग्रस्त आणि दुबळे मानवी जीव आनंदी तरूण आणि सशक्त माणसावर भार टाकून जगत होते.

थकलेल्यांना विसावा हवा होता. वेदनांनी कळवळणाऱ्यांना त्या दुःखापासून मुक्ती हवी होती. त्या सुटकेसाठी ते आक्रोश करत होते. पण आता दुःखाला, वेदनेला आणि पीडेला अंतच नव्हता कारण आता जीवनालाच अंत राहिला नव्हता. आता होती फक्त निर्मिती, जन्म आणि वाढ.

लोक भेदरून गेले. "हा तर काही वर नव्हे. जेव्हा मृत्यू पृथ्वीवर वावरत होता, तेव्हा सारं कांहीं फार बरं होतं." लोक कुजबुजू लागले नि मग ते मृत्यूला शरण गेले.

"यमा, मरण दे. आमची दुःखातून सुटका कर."

यम फुरंगटून बसला होता. "मी काय करू? तुम्हीच हे सारं मागितलं होतं ना? शिवाची आज्ञा मी मोडू शकत नाही."

मग सारे लोक शिवाकडे धावले. "शिवा तुझा वर मागे घे. तो आता शाप ठरला आहे. देवा क्षमा कर." त्यांनी शिवापुढे लोटांगण घातलं.

शिवानं त्यांच्याकडे पाहिलं. त्याची मुद्रा कठोर होती. पण त्याच्या डोळ्यात मात्र खोलवर कुठेतरी करुणा भरली होती. "तुम्हाला धडा मिळाला हे फार छान झालं. यमालाही धडा मिळाला हे चांगलं झालं. आपण सर्वशक्तिमान नाही, अनंत शिव मरणाला जिंकू शकतो हे यम शिकला."

पण पुढे त्याचा आवाज मवाळला. "आता तुम्ही यमाकडे जा आणि त्याची मनधरणी करा. प्रार्थना करा. ही माझी आज्ञा आहे म्हणून सांगा आणि त्याला विनवा की तू मर्त्यलोकात परत ये."

पस्तावून शहाणे झालेले लोक शिवाची आज्ञा घेऊन फिरून यमाकडे गेले.

यम खिन्न होता. पण तोही आता अधिक समजूतदार झाला होता. तो करूणार्द्र होऊन हंसला. "मी येईन" त्यानं आश्वासन दिलं. मग जरा थांबून तो म्हणाला, "पण प्रश्न आहे तो मार्कंडेयाचा. तो मी अजून सोडवलेला नाही."

"होय" लोकांनी त्याच्या बोलण्यात अनुमोदन दिले.

"खरा प्रश्न त्याचाच आहे. तिथूनच सारं सुरू झालं."

ते लोक यमाबरोबर मार्कंडेय बसला होता त्या

ठिकाणी गेले. त्यांनी जो ध्यानस्थ मार्कंडेय पाहिला होता तो तेथे मुळी नव्हताच. पक्षी गात होते. भुंगे गुंजत होते. चतुर गुणगुणत होते. वाहत्या पाण्याचा खळखळ आवाज येत होता. हलत्या फुलत्या सळसळणाऱ्या पानातून सूर्याची किरणं बागडत होती. वारा मंद वहात होता.

मार्कंडेय कधीच अनंतात विलीन होऊन गेला होता.

पुराणातील कथा गेली हजारो वर्षे भारतातील आबालवृद्ध, स्त्री आणि पुरुष विलक्षण गोडीने ऐकत आहेत. **अक्षय कथा** या अंतर्गत अशाच काही प्राचीन कथांचा समावेश करण्यात आला आहे. मनोरंजन हा या कथांचा मूळ उद्देश असला आणि यातील पात्रांचा संबंध देव-धर्माशी जोडला गेला असला तरी या कथांतून अप्रत्यक्षपणे माणसाचे प्रेम, क्रोध, मत्सर यासारखे स्वभावविशेष प्रभावीपणे चित्रित केले आहेत. आधुनिक विज्ञानाने स्वीकारलेल्या अन्न-शृंखला यासारख्या संकल्पनाही जनमेजय आणि आस्तिक यासारख्या कथांमधून डोकावून जातात.

अक्षय कथातील या कथा मूळ इंग्रजीमध्ये, इंग्रजी बाल-साहित्याच्या प्रथितयश लेखिका श्रीमती शांता रामेश्वर राव यांनी लिहिल्या आहेत. मराठीमध्ये दुर्गा भागवत यांनी या कथाचे स्वैर भाषांतर अतिशय रसाळपणे करून दुग्धशर्करा योग घडवून आणला आहे.

अक्षय कथा या अंतर्गत खालील कथांवरची पुस्तके उपलब्ध आहेत.

आस्तिक आणि जनमेजय • कच आणि देवयानी • रुरु आणि प्रमद्वरा • दोन असुर बंधू • मनसादेवी • सती • उमा • सावित्री आणि सत्यवान • यम आणि मार्कंडेय

ओरिएंट लाँगमन

मुखपृष्ठ : बद्रीनारायण
सजावट : वसंत प्रधान

Rao/Bhagwat Savitri-Satyawan • Markendeya-Yama (Marathi)
ISBN 0 86131 784 X

Orient Longman
Rs 12-0.